Impact Factor-8.632 (SJIF)
ISSN-2278-9308
Volume-A
ISSUE No - (CDVIII) 408

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## April -2023

## Pandit Jawaharlal Nehru and Democratization of India



Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
**Dr.Vasant D.Satpute**
Principal
Late Ramesh Warpudkar
ACS College, Sonpeth
Dist.Parbhani

**Assistant Editors**
Dr. Vitthal K. Jaybhaye
Dr. Bapurao V. Andhale
Late Ramesh Warpudkar
ACS College, Sonpeth
Dist.Parbhani

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308

Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDVIII ) 408-A | April, 2023

# A Special Issue on

## Pandit Jawaharlal Nehru and Democratization of India

### Editor

Principal Dr.Vasant D.Satpute

(*Late Ramesh Warpudkar ACS College, Sonpeth Dist.Parbhani*)

### Assistant Editors

Dr. Vitthal K. Jaybhaye
(English)
Dr. Bapurao V. Andhale
(Political Science)
(*Late Ramesh Warpudkar ACS College, Sonpeth Dist.Parbhani*)

### Editorial Board

Dr.Babasaheb Gore
Dr.Haribhau Kadam
Dr.Arun Dalve
Dr. A.L. Gore
Dr. Makrand Jogdand
Dr. Sahebrao Dixit
Dr. Keshav Tidke
Dr. Rajesh Gaikwad

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# INDEX-A



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Jawaharlal Nehru's Foreign Policy: A Study of Non-alignment and India's Global Leadership — Jadhav Ganesh Shankarrao, Dr. V D Satpute | 1 |
| 2 | Pandit Nehru & Education — Mr. Sandeep Bajirao Bodke | 4 |
| 3 | Jawaharlal Nehru's Views on The Relationship of Languages — Dr. V. J. Chavan | 7 |
| 4 | Pandit Jawaharlal Nehru & Economic Development Of India — Dr. Chavan Ashok D. | 9 |
| 5 | Nehru and the Panchsheel Policy — Asso. Prof. Gaikwad Rajesh Kachru | 12 |
| 6 | A Critical Analysis of Nehru's 'The Discovery of India' — Dr. Jawalge Hanumant Rambhau | 15 |
| 7 | Narratives of Democracy and Pandit Jawaharlal Nehru — Mr. Dilipkumar B. Korde,Dr. Krashna S. Aage | 17 |
| 8 | Nehru as an Author: Exploring the Literary Contributions and Impact of India's First Prime Minister — Dr. Kshirsagar O.M., Dhavale Pankaj Balaji | 20 |
| 9 | Jawaharlal Nehru – A Forerunner of Democracy — Mrs.Shweta N. Magar | 24 |
| 10 | Jawaharlal Nehru and his contributions to the Education. — Dr. M. Umamaheswari, | 27 |
| 11 | Nehru as an Author — Mr. Madhavrao Ashok Patil | 31 |
| 12 | Contibution Of Nehru In Advancement Of Education — Dr. A.B. Sarkale | 34 |
| 13 | Jawaharlal Nehru: The all Time Hero of India — Dr.Vitthal K. Jaybhaye, Principal Dr.Vasant D. Satpute | 38 |
| 14 | Ecology and Environmental Conservation in Jawaharlal Nehru's Perception: A Study — Dr.Vitthal K. Jaybhaye, Mr.Anwar Shaikh | 41 |
| 15 | Pandit Nehru's Idealistic Foreign Policy — Dr.Keshav D. Tidke | 44 |
| 16 | Nehru's Views about Democracy — Dr. Patil Shyam Pundalikrao | 46 |
| 17 | पंडित जवाहरलाल नेहरू और पंथनिरपेक्षता का भारतीय मॉडल: एक विश्लेषणात्मक अध्ययन — प्रा. शेख मोईन शेख नईम, प्रा. डॉ. राजीव पवार | 49 |
| 18 | भारत – पाक फाळणीमध्ये पं.नेहरुंचीभुमिका — प्रा. डॉ.आंधळे बी.व्ही. | 53 |
| 19 | अलिप्तवादाचे जनक: पंडित जवाहरलाल नेहरू — प्रा . डॉ. चिंचोले ओंकार गोपीनाथ | 56 |
| 20 | पंडित जवाहरलाल नेहरू यांचे कृषी विकासातील योगदान — प्रा.राठोड नामदेव मंचा | 58 |
| 21 | पंडित जवाहरलाल नेहरू यांचे शेती विषयक विचार — प्रा फाजगे अंगद केशवराव | 61 |
| 22 | पंडित नेहरूंचे धर्मनिरपेक्षतेसंबंधीचे विचार — डॉ. कल्याण गोलेकर | 64 |
| 23 | पंडित जवाहरलाल नेहरूंची लोकशाही संकल्पना — प्रा. डॉ. जाधव अशोक काकासाहेब | 67 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDVIII) 408-A

ISSN : 2278-9308 April 2023

Sonpeth Pin-431516



| | | |
|---|---|---|
| 24 | भारतीय परराष्ट्र धोरणातील नेहरु कालखंड व नेहरुत्तर कालखंड<br>प्रा. डॉ. जाधव बाबुराव भिमराव | 70 |
| 25 | पंडित नेहरू यांचे लोकशाही संबंधी विचार व कार्याचा ऐतिहासिक आढावा<br>प्रा.डॉ. गंगणे अमोल उत्तमराव | 74 |
| 26 | पंडित जवाहरलाल नेहरू: एक शोध प्रा.डॉ.विठ्ठल खंडूजी जायभाये | 77 |
| 27 | पं. जवाहरलाल नेहरू प्रणीत भारतीय लोकशाही आणि तत्वे प्रा. डॉ. कदम एच. पी. | 81 |
| 28 | पंडित नेहरू यांचा लोकशाही समाजवाद प्रा. सखाराम बाबाराव कदम | 84 |
| 29 | पंडित नेहरू आणि साहित्य प्रा. डॉ. खाडप संजय बाबुराव | 87 |
| 30 | पंडित जवाहरलाल नेहरू यांचे आर्थिक धोरण डॉ.मोहन मिसाळ | 90 |
| 31 | पंडित नेहरू यांचे आर्थिक विकासाचे धोरण प्रा.डॉ. मोरे अर्जुन मोहनराव | 92 |
| 32 | पंडित नेहरूंचे लोकशाही समाजवादाविषयी विचार – एक अभ्यास<br>प्रा. नंदुलाल आनंदा पाटील | 95 |
| 33 | स्फूर्तिदायी नेतृत्व आणि सहृदयी पंतप्रधान डॉ. जयदेवी पवार | 97 |
| 34 | पंडित जवाहरलाल नेहरू यांचे भारतीय लोकशाही विकासात योगदान.<br>प्रा.डॉ. तात्या बालकिसन पुरी | 102 |
| 35 | पंडित जवाहरलाल नेहरू यांचे नियोजन व विकास विषयक धोरण व भूमिका<br>डॉ. जयदीप रामकृष्ण सोळुंके | 106 |
| 36 | आधुनिक भारताचे शिल्पकार : पंडित जवाहरलाल नेहरू प्रा. डॉ.सोमवंशी मुक्ता गोविंदराव | 111 |
| 37 | पंडित नेहरू आणि धर्मनिरपेक्षता डॉ . ज्ञानेश्वर लक्ष्मण सोनवणे | 114 |
| 38 | पंडित जवाहरलाल नेहरू आणि धर्मनिरपेक्षता प्रा. डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे | 117 |
| 39 | भारताच्यापरराष्ट्रधोरणनिर्मितीमधील पंडीत नेहरुंचे योगदान डॉ. विलास आघाव | 120 |
| 40 | पंडित जवाहरलाल नेहरू यांचा लोकशाही समाजवाद : एक अभ्यास<br>प्रा. डॉ. वाघूले दत्तात्रय मारुती | 124 |
| 41 | पंडित जवाहरलाल नेहरू यांचे लोकशाही संबंधी विचार<br>डॉ. संजय पंढरीनाथ गायकवाड | 128 |
| 42 | पं. नेहरू आणि त्यांचा धर्मनिरपेक्षते संबंधीचा दृष्टिकोन प्रा.डॉ.उद्धव निर्वळ | 131 |
| 43 | अलिप्ततावादाची समकालीन शांतिवादी उपयुक्तता: एक संक्षिप्त चिकित्सा<br>डॉ. संदीप विलासराव घोडके | 134 |
| 44 | पंडित जवाहरलाल नेहरू यांची आर्थिक धोरण प्रा.डॉ.बी.आर शिंदे | 137 |
| 45 | पंडित नेहरू – आधुनिक भारताचे शिल्पकार शाम गंगाधर आवटे | 139 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDVIII) 408-A
ISSN : 2278-9308
April, 2023

# पंडित जवाहरलाल नेहरू: एक शोध

प्रा.डॉ.विठ्ठल खंडूजी जायभाये
इंग्रजी विभाग, कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी (महाराष्ट्र)
संपर्क: ९१५८०६४०६८ E-mail ID: jayvithal@gmail.com

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta Sonpeth Dist.Parbhani

सारांश:

भारतीय स्वातंत्र्य चळवळ आणि त्यातून प्राप्त झालेले स्वातंत्र्य हा एक महत्वपूर्ण अभ्यासाचा विषय असून यामध्ये विविध भारतीय धुरिणांचे महत्वपूर्ण योगदान आपल्याला अधोरेखित करणे क्रमप्राप्त ठरते. त्याच न्यायाने प्रस्तुत शोध निबंधामध्ये भारताचे पहिले पंतप्रधान श्री पंडित जवाहरलाल नेहरू यांचे सर्वांगीण योगदान आणि तत्संबंधाने महत्वपूर्ण विवेचन केले जाणार आहे. या शोधनिबंधामध्ये "पंडित जवाहरलाल नेहरू: एक शोध" शीर्षकांतर्गत त्यांच्या सर्वांगीण कार्याचा लेखाजोखा इथे मांडला जाणार असून त्यातून काही महत्वपूर्ण निकष काढले जाणार आहेत. त्यासाठी संशोधक मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील विविध महत्वपूर्ण ग्रंथ, नियतकालिके, भाषणे इत्यादीचा संदर्भ म्हणून वापर करणार आहे.

महत्वपूर्ण शब्द: स्वातंत्र्य, लोकशाही, समाजवाद, मानवतावाद, पंचशील

**प्रस्तावना:**

भारतीय स्वातंत्र्य लढा आणि त्यासाठी अनेक थोर व्यक्तींनी आपल्या जीवनातील अनमोल क्षणांचे योगदान दिले आहे. अनेक भारत मातेच्या सुपुत्रांनी आपल्या प्राणाची आहुती देऊन भारतमाता ब्रिटीशांच्या जोखडातून मुक्त केली आहे. १८५७ च्या स्वातंत्र्य समराने भारतीय स्वातंत्र्य लढा प्रारंभ झाला आणि पुढे तो आणखीनच तीव्र होत गेला. या लढ्यांत जालियानवाला बाग हत्याकांड आणि अशा अनेक हृदयद्रावक घटना घडल्या. अनेक निरपराध लोक मारले गेले. भगत सिंग, सुखदेव, राजगुरू, बाबू गेनू कांबळे अशा एक ना अनेक शूरवीर सुपुत्रांना आपले बलिदान द्यावे लागले. नेताजी सुभाष चंद्र बोस, लाल बहादूर शास्त्री, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, लाला लजपतराय, बिपीन चंद्र पाल, महात्मा गांधी, अरुणा असफ आली, सरोजिनी नायडू यांच्या बरोबरच डॉ.बाबासाहेब आंबेडकर, जवाहरलाल नेहरू आदींनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आपले महत्वपूर्ण योगदान दिले. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकांत जवाहरलाल नेहरू परदेशातील शिक्षण संपवून भारतात आले आणि आपल्या वडिलांच्या वकिली व्यवसायाला हातभार लावयला सुरुवात केली. याच काळात भारतीय स्वातंत्र्य चळवळ सर्वत्र जोर धरू लागली. युवा जवाहरलाल नेहरू या सर्वच क्रांतिकारकांच्या कार्याने प्रेरित झाले आणि भारतीय स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली.

**संशोधनाची उद्दिष्टे:** प्रस्तुत शोध निबंधामध्ये संशोधकाने खालील उद्दिष्टे ठेवून निबंध लेखन केले आहे.

१. जवाहरलाल नेहरूंची भारताच्या उभारणीत भूमिका
२. जवाहरलाल नेहरूंचे वैचारिक अधिष्ठान

**गृहीतक:** पंडित जवाहरलाल नेहरू हे आधुनिक भारताचे शिल्पकार आहेत.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंध हा विविध ग्रंथातील संदर्भ घेऊन लिहिला जाणार असून कोणतीही प्रश्नावली अथवा मुलाखत तंत्र इथे उपयोगात आणले जाणार नाही. त्या अनुषंगाने इंग्रजी संशोधनातील MLA 8 या अद्ययावत संशोधन प्रणालीप्रमाणे इथे संदर्भ दिले जाणारा आहेत.

## पंडित जवाहरलाल नेहरू: एक शोध

### १. जडणघडण:

गर्भश्रीमंत, उच्च ब्राह्मण असलेले वकील मोतीलाल नेहरूंच्या घरात जवाहरलाल नेहरूंचा जन्म झाला. मातोश्री सरूप राणी यांच्या रामायण आणि महाभारतातील गोष्टींचा मूलगामी प्रभाव त्यांच्या जीवनावर पडला. यामुळेच जवाहरलाल नेहरू आपल्या आत्मचरित्रात, "माझ्या आईच्या पौराणिक शिकवणुकीचा माझ्यावर खोलवर ठसा आहे" याची काबुल देतात. शिस्तप्रिय मोतीलाल नेहरूंचे आपल्या पुत्रांवर विशेष लक्ष होते. जवाहरलाल यांना डॉ.एनी बेझंट, मिस्टर ब्रूक्स सारखे इंग्रजी शिक्षक होते. त्यानंतरचे त्यांचे शिक्षण परदेशी संपन्न झाले. परदेशी शिकत असले तरी जवाहरलाल नेहरूंनी आपली भारतदेश आणि देशप्रेम याची नाळ तुटू दिली नाही. भारतातील स्वातंत्र्य चळवळ आणि विविध घडामोडींवर त्यांचे बारीक लक्ष होते. त्याचे वडील मोतीलाल नेहरू राष्ट्रीय कॉंग्रेसच्या चळवळशी निगडीत होते. आईची धार्मिक वृत्ती आणि वडिलांचे शिस्तबद्ध वर्तन याचा खोलवर प्रभाव जवाहरलाल नेहरूंच्या व्यक्तिमत्व

जडणघडणीवर दिसून येतो. लहानपणी घरात कोणत्याप्रकारचे संस्कार रुजले जातात यावर माणसाच्या पुढील आयुष्याची बैठक अवलंबून असते. याच अनुषंगाने जवाहरलाल नेहरू हे श्रीमंत-उच्च कुळात आणि उच्च शिक्षित असून देखील त्यांची नाळ संस्कारापासून तुटली नाही. त्याचबरोबर त्यांच्या वडिलांचे कॉंग्रेस आणि स्वातंत्र्य चळवळीचे विचार घेऊनच पुढे त्यांची वाटचाल झाली. यातच बरेच काही लक्षात येते.

२. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत योगदान:

माणूस तारुण्यात कोणत्या विचारांच्या सानिध्यात येतो आणि त्याची जीवन बांधणी कशी होते(?) यावर त्याच्या उत्तर आयुष्याचा मार्ग लक्षात येतो. ब्रिटनमध्ये शिक्षण घेत असतांना भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये विविध घडामोडींची माहिती जवाहरलाल नेहरूंना मिळत होती. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही महान तत्वे जगाला खुणावत होती. भारतीयांना राष्ट्र, स्वातंत्र्य, समता याची जाण होऊ लागली. भारत स्वतंत्र असावा आणि आपल्या देशात आपले शासन असावे असे वाटू लागले. नेहरूंनी १९१२ साली लोकमान्य टिळक आणि एनी बेझंट यांच्या सोबत होमरूल चळवळीत सहभाग घेतला. गांधीजींची भेट झाली आणि ते पूर्णतः बदलले. जालियानवाला बाग हत्याकांडावरच्या प्रतिक्रियेमुळे जवाहरलाल नेहरू चर्चेत आले. युरोपचा दौरा करून भारतात परतल्यावर सायमन कमिशनच्या विरोधात आंदोलन केले. ई.स.१९२९ च्या कॉंग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष झाले. "हे योग्यच आहे की; जवाहरलाल नेहरूंनी मुकुट घालावा; कारण भविष्यात खरोखरच देश तरुण पिढीच्या हातात असला पाहिजे (सत्याचे प्रयोग १२)" हे गांधीजींचे उद्गार महत्वपूर्ण आहेत. त्यानंतर त्यांचा स्वातंत्र्य चळवळीत सहभाग वाढतच गेला. ३१ डिसेंबर १९२९ साली कॉंग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केली. त्यांतर नेहरूंनी झंजावाती दौरे करून, ब्रिटीशांच्या विरोधात रान उठवले. जवाहरलाल नेहरूंना गांधीजींच्या बरोबरीने स्थान मिळायला लागले. लोकशाही विचारांचे नेहरू ८ ऑगस्ट १९४२ च्या "भारत छोडो!" चळवळीत राष्ट्रीय नेतृत्वाबरोबर अग्रेसर होते. यात गांधीजी, डॉ.राजेंद्र प्रसाद, सरदार पटेल, मौलाना आझाद आणि जवाहरलाल नेहरूंना अटक करून अहमदनगरच्या किल्ल्यामध्ये ३ वर्षे कैदेत ठेवण्यात आले. तिकडे दुसरे महायुद्ध संपुष्टात येत होते. ब्रिटनमध्ये १९४७ च्या दरम्यान मजूर पक्ष सत्तेत आला आणि त्या नव्या सरकारने घटना समितीच्या निर्मितीसाठी भारतात निवडणुका घेण्याचे आदेश काढले. आता मात्र भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील काम करणाऱ्यांना स्वातंत्र्य खुणावू लागले. शेवटी तो सुवर्ण दिवस उजाडला आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला.

३. पहिले पंतप्रधान: आव्हाने आणि सोडवणूक:

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला आणि पहिले पंतप्रधान म्हणून जवाहरलाल नेहरूंनी शपथ घेतली. देश स्वतंत्र झाल्यानंतर त्यांचे "ट्रिस्ट विथ डेस्टिनी" म्हणजे "भाग्यासोबत करार" हे पहिले [illegible] महत्वपूर्ण होते. त्यामध्ये स्वतंत्र भारताची पुढील वाटचाल नेहरूंनी अधोरेखित केली होती. "निश्चितपणे आम्ही सर्व भारतीय जनतेला आश्वासन देतो की; पुढेही जनतेने या महान कार्यात आम्हाला निष्ठा आणि विश्वासाने सहकार्य करावे, हा स्वतंत्र भारत आपल्याला आदर्श राष्ट्र बनवायचे असून ज्यामध्ये भारत मातेची सर्व मुले आनंदाने वास्तव्य करतील. दुःखाचा खडतर काळ संपला असून आता आपल्याला निरंतर प्रयत्न करून भूतकाळात केलेले सर्वच शुभ संकल्प तडीस न्यावयाचे आहेत. दारिद्र्य, अज्ञान, विषमता देशाबाहेर घालवून आपल्याला दुःखीतांचे अश्रू पुसावे लागणार आहेत. भारतीय लोकशाही पुढे घेऊन जातांना शांती आणि लोकस्वातंत्र्यासाठी आपण कटीबद्ध राहूयात. भारताची शाश्वत आणि नवस्फूर्ती देणारी संस्कृती अभेद्य ठेवून भारत मातेची सेवा करण्याचे अभिवचन देऊन मातृभूमीला शत शत नमन करतो! जय हिंद! (नेहरूंची भाषणे)" पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंचे हे भाषण म्हणजे भारताच्या भविष्यातील शाश्वत विकासाच्या वाटचालीची जणू ही रूपरेषा (ब्ल्यू प्रिंट) आहे. यातून त्यांची दूरदृष्टी आणि शेवटच्या व्यक्तीच्या उत्थानाची तळमळ दिसून येते. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सर्वांगीण विकासासाठी आपण कटीबद्ध आहोत याची ग्वाही नेहरू इथे देतांना दिसतात. सतरा वर्षे सलग पंतप्रधान म्हणून काम करतांना सुरुवातीच्या काळात अनेक खडतर आव्हाने त्यांनी लीलया पेलली. भारत-पाकिस्तान फाळणी, भारतीय राज्यघटनेची बांधणी, महात्मा गांधीजींचा खून व त्यानंतर निर्माण झालेली परिस्थिती आणि अशा अनंत बाबींना धीरोदात्तपणे सामोरे जाऊन नेहरूंनी देश खडतर काळातून पुढे आणला. कठीण काळात शांत, संयमी आणि दूरदृष्टीने देशाची बांधणी करण्याचे महत्कार्य जवाहरलाल नेहरूंनी केल्यामुळे जागतिक स्तरावर भारताची 'एक मोठा लोकशाही देश' म्हणून ओळख निर्माण झाली.

४. राष्ट्रवाद:

तरुण वयातच देशप्रेमाची भावना खोलवर रुजल्यामुळे देश स्वातंत्र्यानंतर जवाहरलाल नेहरूंनी राष्ट्रवाद जोपासला. देश नावाची संकल्पना रुजविली. भारत देश एकसंध बनवला. विविध राज्ये आणि संस्थाने भारतात विलीन केली. प्रसंगी बळजबरीने, मिलिटरीच्या सहाय्याने हरिसिंग किंवा निजामासारखे संस्थानिक सरदार वल्लभभाई पटेल, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसारख्या आपल्या खंबीर सहकाऱ्यांच्या मदतीने भारतात विलीन केले. सुरुवातीच्या काळात भारत देशभर राष्ट्र आणि राष्ट्रवाद काय असतो(?) याची रुजवणूक करण्याचे महत्कार्य नेहरूंनी केले. लोक एकसंध

बांधण्याचे हे सुरुवातीचे कार्य अत्यंत मोलाचे ठरले. त्यांच्या सोबतची माणसेही तेवढीच निष्ठावान आणि प्रचंड राष्ट्रवादी असल्यामुळे त्यांना ही भूमिका पुढे न्यायला सोपे गेले. खंबीर, वैचारिक पार्श्वभूमीतून दुर्गुण-दुष्ट प्रवृत्तींचा नि:पात केला. विरोधकांशी सलोखा आणि शांततापूर्ण व्यवहार करून नेहरूंनी आपले राष्ट्रवादाचे इप्सित साध्य केले.

**५. समाजवाद:**

आधुनिक कालखंडातील लोकप्रिय विचारप्रणाली म्हणजे समाजवाद! समाजवाद म्हणजे जिथे एक आदर्श, एक विचार, एक देश, एक धर्म, एक विश्वास, एक जीवनपद्धती इत्यादी बाबी हातात हात घालून गुण्यागोविंदाने एकत्र नांदतात. हा एक विकसनशील आणि परिवर्तनवादी विचार-कार्यक्रम आहे. समाजवाद हा सर्वोच्च मानवतावाद असून यात अर्थाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. याच अनुषंगाने राष्ट्रपिता महात्मा गांधी हे एक महान समाजवादी विचारवंत होते. त्यांचाच प्रभाव पंडित जवाहरलाल नेहरूंवर दिसून येतो. स्वतंत्र भारतात नेहरूंनी गांधीवादी-समाजवाद जोपासून देशाचा नैतिक आणि अध्यात्मिक विकास करण्याचे कार्य केले. सर्वच वर्गांचे सहकार्य घेऊन देशाची प्रगती झाली. भांडवलवादी व्यवस्थेला आळा घालून सामन्यांच्या उत्थानाचे अर्थशास्त्र देशात रुजविण्याचे कार्य समाजवादी पंतप्रधान नेहरूंनी केले. कृतीशील विचारवंत जयप्रकाश नारायण (जेपी) यांचा लोकशाही-समाजवाद हा महत्वपूर्ण विचार असून त्यासाठी एखाद्या हिंस्रक उठावाची किंवा हुकुमशाहीची गरज नाही. संसदीय पद्धतीने देशात समाजवाद रुजविला जाऊ शकतो यावर जेपींचा पूर्ण विश्वास होता. समाजवादासंबंधी बोलतांना नेहरू म्हणाले होते, "समाजवाद हा आर्थिक सिद्धांतापेक्षाही महत्वपूर्ण असून ते जीवनाचे महत्वपूर्ण तत्वज्ञान आहे. माझ्या दृष्टीने दारिद्र्य, चारी बाजूंनी पसरलेली बेकारी, भारतीय जनतेचे अध:पतन तसेच गुलामगिरी संपवण्याचा मार्ग समाजवादाला सोडून दुसऱ्या कोणत्याही प्रकारे दिसत नाही (Shankar 220)." यावरून समाजवादी विचार जवाहरलाल नेहरूंना भारतासाठी किती महत्वपूर्ण वाटत होते हे लक्षांत येते.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin 431516 Dist Parbhani

**६. मानवतावाद:**

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे टोकाचे मानवतावादी विचारसरणीचे होते. महात्मा गांधीजींच्या सहवासात जडणघडण झालेले नेहरू शांत-संयमी वृत्तीचे होते. त्यांना कधीच युद्ध नको होते. कोणताही प्रश्न चर्चा आणि सामोपचाराने सुटला पाहिजे या मताचे ते होते. बालपणापासूनच घरात ब्राह्मण्याचे संस्कार आणि पुढे ब्रिटनमध्ये शिक्षण घेतांना तेथील वातावरण बौद्धिक आणि मानवतावादी असल्यामुळे नेहरू उदारमतवाद आणि मानावातावादाने प्रेरित होते. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारांनी प्रेरित झालेले नेहरू डिस्कवरी ऑफ इंडिया ग्रंथात "मनुष्य एका विशाल मानवतेच भाग आहे. माणूस माणसाचा विश्वास गमावू शकणार नाही. एकवेळ आपण ईश्वरी सत्तेला नाकारू शकतो परंतु माणसाच्या अस्तित्वाला नाकारणे माणसालाच घातक असेल (४८०)." हे वाचल्यावर आपल्याला त्यांच्यातील खोलवर रुजलेला मानवतावादी विचारवंत नजरेस पडतो. नेहरूंसाठी माणूस केंद्रस्थानी होता. त्यामुळेच त्यांनी पंतप्रधान म्हणून काम करतांना आपली राजकीय साधन सुचिता दुभंगू दिली नाही. सत्ताधारी आणि विरोधकांना सोबत घेऊन नेहरूंनी राज्यकारभार चालवला. यातच त्यांचा मानवतावाद लक्षात येतो.

**७. धर्मनिरपेक्षता:**

जगाच्या इतिहासात भारताला देश म्हणून मान्यता भारत स्वतंत्र झाल्यावर मिळाली. नावाला भारत परंतु इथे जात आणि धर्माच्या नावावर विविध राजे-महाराजे आपापली संस्थाने सांभाळत होती. सम्राट अशोकानंतर एकसंध भारत भारत देश म्हणून शिल्लक राहिला नव्हता. स्वातंत्र्याने भारताला एकत्र बांधले. यामध्ये सर्वच समाज धुरीणांचा सिंहाचा वाटा होता. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या मते देशात विविध धर्माचे लोकांनी आपापला धर्म आपापल्या कक्षेत पालन करावा. एखाद्या धर्माचा उपद्रव इतर धर्माला होता कामा नये. मिलच्या मते, 'एका उदार राज्याच्या मागे एका उदार समाजाची धारणा आहे.' याप्रमाणे नेहरूंचा धर्मनिरपेक्षता सिद्धांत मिलच्या उदार समाजाची आधारशीला ठरतो. त्यातूनच उदार-धर्मनिरपेक्ष राज्याची निर्मिती होऊ शकते. नेहरूजी धर्माविषयी आपल्या आत्मचरित्रात लिहितात, "धर्माचा अर्थ म्हणजे पूर्ण निष्ठेसह सत्याचा शोध घेणे असून त्यासाठी सर्वस्वाचे बलिदान करण्यास सदैव तत्पर असणे म्हणजे धर्माचे पालन करणे होय (*An Autobiography 38*)." यावरून नेहरूंचे धर्माविषयी विचार दृगोचर होतात. अंधविश्वास, कर्मकांड, थोतांड इत्यादी असलेल्या धर्माला नेहरूंनी कधीही मान्यता दिली नाही. त्यांचा धर्म हा विवेक-विचारांवर आधारित धर्मविचार होता. गीता आणि उपनिषद तत्वज्ञानाचा त्यांच्यावर खोलवर प्रभाव दिसून येतो.

**८. आंतरराष्ट्रीय संबंध:**

जवळपास दोनशे वर्षांच्या ब्रिटीश जोखडातून भारत देश १९४७ साली मुक्त झाला. भारतासमोर अनेक आव्हाने आ वासून उभी होती. पाकिस्तान फाळणी सारख्या मोठ्या धक्क्यातून देश सावरत होता. पहिले पंतप्रधान म्हणून शपथ घेतल्यानंतर पंडितजींसमोर अनंत आव्हानांचा पहाड उभा होता. देशांतर्गत असलेले विविध प्रश्न आणि त्याचबरोबरीने अंतरराष्ट्रीय स्तरावर देश म्हणून भारताची ओळख निर्माण करणे हे सुद्धा मोठे आव्हान त्यांच्यासमोर

होते. अशा परिस्थितीत न डगमगता नेहरूंनी जगभर आपला संपर्क जोडून घेतला. नेहरूंची शांतताप्रिय, प्रगल्भ वृत्ती त्यांना अनेक पातळ्यांवर फायदेशीर ठरली. युद्धामुळे मनुष्याचा विनाश होतो. त्यांना युद्ध मान्यच नव्हते. नुकतीच दोन महायुद्धे जगाने अनुभवली होती. दोन्ही महायुद्धाने अनेक देश रसातळाला गेले होते तर अनेक नेस्तनाबूद झाले होते. त्यामुळे स्वातंत्र्यापूर्वी आणि नंतर सुद्धा नेहरू युद्धाच्या विरोधी होते. नेहरू आंतरराष्ट्रीय मैत्री तसेच शांततेचे पुरस्कर्ते होते. दक्षिण पूर्व आशिया आणि बगदाद संधी संघटनांचा नेहरूंनी कडाडून विरोध केला. १९५६ सालच्या संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेत भाषण देतांना सांगितले की, "शित युद्ध लोकांच्या मनात सदैव युद्धाची भावना निर्माण करते. शीतयुद्धाची विचारप्रणाली चुकीची असून ती लोकांच्या मनात नेहमी भीती निर्माण करते. युद्ध भावना शांतता आणि सहकार्याच्या विरोधात असल्यामुळे सार्वभौमत्व धोक्यात येते (Brecher 151)." नेहरूजींचे हे प्रगल्भ विचार भारताला अलिप्त देशाच्या संगतीत नेऊन बसवतात. त्यामुळे भारत अनेक युद्धापासून वाचला गेला. त्यांच्यामुळेच महात्मा बुद्ध, महात्मा गांधीजींचा शांतताप्रिय देश म्हणून जगाच्या इतिहासात भारताची ओळख निर्माण झाली.

याशिवाय पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या विषयी त्यांची पंचशील योजना, महात्मा गांधीजींचा प्रभाव तसेच लोकशाहीची मुल्ये जसे की; स्वातंत्र्य, समता, बंधुता, सत्तेचे विकेंद्रीकरण, बळकट विरोधी पक्ष, जबाबदार राजकीय पक्ष, वयस्कर मतदार, अधिकार व कर्तव्याबाबत जागरुकता, सुशिक्षित राष्ट्र, योजनाबद्ध विकास, महिलांचा सामाजिक उत्कर्ष, बळकट-आदर्श लोकशाही इत्यादी महत्वपूर्ण मुल्ये पंडित जवाहरलाल यांच्या एकूण कार्यप्रणालीमध्ये आढळून येतात. या सर्वच मुद्यांच्या विस्तारला या शोध निबंधात मर्यादा येत असल्यामुळे तूर्तास एवढ्यावरच आपण पंडितजींना स्मुउन घेवूयात.

**समारोप:**

अशाप्रकारे जवाहरलाल नेहरूंचा बालपणापासून ते शेवटपर्यंतचा आढावा घेतला असता; नेहरू हे भारताच्या मुलभूत जडणघडणीत महत्वाचे व्यक्ती ठरतात. त्यांची प्रगल्भ, शांतताप्रिय, लोकशाहीवाद, समाजवादी, धर्मनिरपेक्षता, मानवतावादी भूमिका कालातीत असून ते नित्य-निरंतर देशाचे मार्गदर्शक नेतृत्व आहेत यात तिळमात्र शंका नाही. ते भारताचे राष्ट्रपुरुष असून वर्तमानकाळी कोणत्याही राष्ट्रपुरुषाच्या संदर्भात त्या व्यक्तीचा सर्वांगीण अभ्यास करूनच आपले मत नोंदवणे क्रमप्राप्त ठरते. जवाहरलाल नेहरूंचे आत्मचरित्र वाचल्यानंतर गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांनी नेहरूंना पत्र लिहून कळवले की, "मी तुमचे आत्मचरित्र आत्ताच संपविले आहे. मी तुमच्या यशाने अतिशय प्रभावित झालो आहे आणि याचा मला गर्व आहे. आपल्या चरित्रातून मानवतेची सखोल धारा वाहते आहे." यावरून पंडित जवाहरलाल नेहरू कोणत्या उंचीचे व्यक्तिमत्व होते(?) याचा बोध होतो आणि नेहरू हे आधुनिक भारताचे शिल्पकार आहेत या निष्कर्षावर शिक्कामोर्तब होते.

**संदर्भ:**

१. *सत्याचे प्रयोग (माझी आत्मकथा)*. महात्मा गांधी, अजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, १९९९

२. Brecher, Michael. *Nehru: A Political Biography*. 1st ed., Oxford UP, 1999.

३. *Nehru Speeches:1946-1949.*1st ed., Division Ministry of Information & Broadcasting Publications, 2017.

४. Nehru, Jawaharlal. *The Discovery of India*. 1st ed., Merldian Books, London, 1945.

५. Nehru, Jawaharlal. *Jawaharlal Nehru: An Autobiography ; with Musings on Recent Events in India*. 1st ed., Asia, Bombay, 1936.

६. Shankar, Girja. *Socialist Trends in Indian National Movement: Being a Study of the Congress Socialist Party*. 1st ed., Merrut, 1987.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani